महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २८३ वा दिनांक : ११/०९/२०२५ वार : गुरूवार

## ओबीसी उपसमितीच्या बैठकीत भुजबळ आक्रमक



**मुंबई :** ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी बुधवारी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या जीआरवर आपला संताप व्यक्त केला. सरकारने कुणबी नोंदी संदर्भात काढलेल्या जीआरमुळे ओबीसींना फटका बसणार आहे. विशेषतः मागील २० वर्षांत ओबीसी समाजाला फार कमी निधी मिळाला. पण त्या तुलनेत मागील २-३ वर्षांतच मराठा समाजाला त्याहून कितीतरी जास्त निधी मिळाला, असे ते म्हणालेत.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात आज ओबीसी उपसमितीची पहिली बैठक झाली. या बैठकीला समितीचे सदस्य छगन भुजबळ, पंकजा मुंडे, गुलाबराव पाटील, अतुल सावे, संजय राठोड, दत्तात्रय भरणे यांच्यासह इतर मगासा बहुजन कल्याण विभागाचे सचिव व इतर अधिकारी उपस्थित होते. त्यात भुजबळ यांनी मराठा समाजाच्या तुलनेत ओबीसींना फार कमी निधी मिळत असल्याची खंत व्यक्त केली. तसेच सरकारच्या जीआरमधील काही शब्दांवर आक्षेप नोंदवत ओबीसींना फटका बसेल असा जीआर काढल्याप्रकरणी इतर मागासवर्गीय विभागाच्या अधिकाऱ्यांवरही राग व्यक्त केला.

मराठा समाजाला मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला. त्या तुलनेत अनेक जाती असूनही ओबीसींना फार कमी निधी देण्यात आला. या प्रकरणी सरकार व वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणाचे समर्थन होऊच शकत नाही. जीआर निघाल्यामुळे आपण सर्वजण असहाय्य झालो आहोत. इथे प्रश्न सुटला नाही, तर आम्ही थेट कोर्टात जाऊन निर्णय घेऊ, असे भुजबळ म्हणाले.

छगन भुजबळ यांच्या या संतापानंतर ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना तसे निवेदन उपसमितीपुढे सादर करण्याचे निर्देश दिले. काही नेत्यांचा ओबीसी समाजावर अन्याय होणार असल्याचा गैरसमज आहे. त्यावर मंत्रिमंडळाच्या उपसमितीत चर्चा झाली. बैठकीत एकही चुकीचे प्रमाणपत्र दिले जाऊ नये यावरही उहापोह झाला. विशेषतः छगन भुजबळ राज्य सरकारच्या जीआर विरोधात कोर्टात गेले तर तो सर्वस्वी त्यांचा निर्णय असेल. तूर्त कुणाला ओबीसींवर अन्याय होत असल्याचे कुणाला वाटत असेल तर त्यांनी उपसमितीला निवेदन पाठवावे. त्यावर समिती विचार करेल, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, मंत्री पंकजा मुंडे यांनीही ओबीसीच्या मुद्यावर या बैठकीत ठाम भूमिका घेतली. मराठा समाजाला बोगस प्रमाणपत्र देण्यात येऊ नयेत. तसेच मराठा आरक्षणाबाबत अवैध दाखलेही देऊ नये, असे त्या म्हणाल्या. या प्रकरणी श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही पंकजा यांनी यावेळी दिली.

उल्लेखनीय बाब म्हणजे छगन भुजबळांनी मंगळवारी सरकारने मराठा आरक्षणाचा जीआर प्रचंड दबावाकाली काढल्याचा आरोप केला होता. ते म्हणाले होते, सरकारने गत २ सप्टेंबर रोजी काढलेला जीआर हा प्रचंड दबावाखाली काढण्यात आला. या प्रकरणी ओबीसीची एक समिती स्थापन झाली. तिच्याशीही या प्रकरणी काही चर्चा झाली नाही. सरकारने यासंबंधी काही सूचना व हरकतीही मागवल्या नाहीत. या जीआरमुळे ओबीसीतील ३५० हून अधिक जातींवर अन्याय झाला. त्यामुळे एकतर हा जीआर मागे घ्या किंवा त्यात योग्य ती सुधारणा करा.

भुजबळ पुढे म्हणाले होते, आमचा जीआरमधील 'मराठा समाज' या शब्दावर आमचा आक्षेप आहे. त्यांनी मराठा समाजाचा उल्लेख ओबीसी किंवा कुणबी अथवा मराठा - कुणबी किंवा कुणबी - मराठा असा करण्याची गरज होती. पण त्यांनी हा शब्दप्रयोग टाळला. मराठा समाज हा शब्द वापरला. मराठा व कुणबी हे दोन्ही वेगवेगळे समाज आहेत. हे यापूर्वीच स्पष्ट झाले आहे. स्वतः महाराष्ट्र सरकारने कुणबी हे ओबीसी, तर मराठा समाज हा शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागास असल्याचे कबूल केले होते. २०२४ मध्ये एसईबीसी कायदा मराठा समाजासाठी पारित झाला आहे. या अंतर्गत शासनाने मराठा समाजाला शिक्षण व नोकऱ्यांत १० टक्के आरक्षण दिले आहे. हा समाज शैक्षणिक व आर्थिकृष्ट्या मागास असू शकतो. पण तो सामाजिकदृष्ट्या मागास नाही. त्यामुळे त्यांचा ओबीसीत समावेश करणे साफ चुकीचे आहे, असे ते म्हणाले होते.

## प्रेम संबंधातून फसवणूक, उपसरपंचाची आत्महत्या २१ वर्षीय तरुणी ताब्यात





**बीड :** बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील माजी उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे (३४) यांच्या आत्महत्येनंतर संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. कला केंद्रातील एका नर्तिकेच्या प्रेमात अडकलेल्या गोविंद यांनी तिच्या घरासमोर गाडीमध्ये स्वतःवर गोळी झाडून जीवन संपवले. या प्रकरणातील नर्तिका पूजा गायकवाडला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गोविंद बर्गे यांच्या आत्महत्येच्या घटनेनंतर पूजा गायकवाडचा एक इंस्टाग्राम व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये ती एका ऑडिओवर अभिनय करताना दिसत आहे, ज्यात 'मला या माणसाची विचित्र सवय लागली आहे, हा माझ्या आयुष्यातून गेला तर फार अवघड होईल' असे बोलले आहे. तिच्या एका हातात ५०० रुपयांची नोट आणि चार बोटांमध्ये सोन्याच्या अंगठ्या दिसत आहेत. ही क्लिप आता या प्रकरणाच्या संदर्भात पाहिली जात आहे.

ओळखीचा फायदा घेऊन प्रेमसंबंध ठेऊन वेळोवेळी पैसे, सोने लुबाडले. दिलेल्या पैशातून मावशी व नातेवाईकांच्या नावावर प्लॉट जमीन घेतली. तरीही भावाच्या नावावर ५ एकर शेती करावी किंवा गेवराईतील नवीन घर माझ्या नावावर कर नाहीतर तुझ्यावर दुष्कर्माचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन पैशासाठी नर्तिका पूजा देविदास गायकवाड (२१, रा. सासुरे ता. बार्शी, जि. सोलापूर ) हिने वारंवार तगादा लावला. त्यामुळेच गोविंदने आत्महत्या केल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली.

दुष्कर्माचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन पैशासाठी नर्तिका पूजा देविदास गायकवाड (२१, रा. सासुरे ता. बार्शी जि सोलापूर) हिने वारंवार तगादा लावल्याची तक्रार गोविंद यांचे मेहुणे लक्ष्मण जगन्नाथ चव्हाण (रा .नंदापूर, जि . जालना) यांनी वैराग पोलिसांत फिर्याद दिल्यानंतर गुन्हा दाखल झाला असून तिला ताब्यात घेतले आहे.

गोविंदला लोकनाट्य कला केंद्रात कला पाहण्याची आवड होती. दीड वर्षापूर्वी थापडीतांडा कला केंद्रामध्ये पूजा नर्तकीसोबत त्याची ओळख झाली. हळूहळू तिचा प्रवास जसा पारगाव कला केंद्राकडे वळला तसे त्यांच्यातील मैत्रीचे संबंध प्रेमामध्ये गुंफल्याचे सांगण्यात येते. सोन्याच्या दागिन्यांसह सुमारे पावणेदोन लाख रुपयांचा १ मोबाइलदेखील नर्तकीला भेट दिला होता. अलिकडे तिने गोविंदशी संपर्क तोडल्यामुळे तो नैराश्यात होता. अनेकदा संपर्क साधण्याचा तो प्रयत्न करत असे. मात्र, पूजा प्रतिसाद देत नव्हती. गोविंद सासुरे येथे सोमवारी मध्यरात्री आला. मंगळवारी कारमध्ये स्टिअरिंगवर मृतावस्थेत आढळला.

## कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून सरकारने राज्यातील शेतकऱ्यांचा जीव घेतला, काँग्रेसचा आरोप

**मुंबई :** कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून गद्दारी करणाऱ्या महायुती सरकारमुळे अवघ्या ८ महिन्यांत तब्बल ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. यात पश्चिम विदर्भातील ७०७, तर छत्रपती संभाजीनगरमधील ५२० शेतकऱ्यांचा समावेश आहे, असे ते म्हणालेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीने आपल्या जाहिरनाम्यात शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. पण निवडणुकीनंतर अद्याप त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. परिणामी, विरोधकांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी वरील आरोप केला आहे. ते बुधवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, महाराष्ट्रातील महायुती सरकारने शेतकऱ्यांचा जीव घेतला. कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून गद्दारी करणाऱ्या या महायुती सरकारमुळे आठ महिन्यांत तब्बल ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पश्चिम विदर्भात ७०७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. सत्तेसाठी ह्या सरकारने भोळ्या - भाबड्या शेतकरी बांधवांना कर्जमाफीचं आश्वासन देऊन मते मिळवली. पण शेतकऱ्यांना मिळालं काय तर कर्जमाफीसाठी समिती.

अतिवृष्टीने आता शेतकरी उद्ध्वस्त झाला. हातातलं पिकं गेलं, बँका कर्ज देत नाहीत. हतबल होऊन शेतकरी टोकाचं पाऊल उचलतोय. पण सरकारला काही देणंघेणं नाही. महायुतीतील तीन पक्ष एकमेकांशी भांडतात, समाजात फुट पाडतात आणि शेतकरी मात्र मरत राहतो. हे सरकार गेंड्याच्या कातडीचं झालंय. शेतकरी मेला, कुटुंब उद्ध्वस्त झालं तरी यांना लाज नाही. कृषी खात्यातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा न करता कर्मचाऱ्यांना टॅब द्यायचे का लॅपटॉप यावरून वाद सुरू आहेत. हे खाते शेतकऱ्यांसाठी काम करते का? शेतकरी आत्महत्यांसाठी थेट जबाबदार कोण असेल तर ते म्हणजे असंवेदनशील आणि विश्वासघातकी महायुती सरकार, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ सप्टेंबर २०२५


## विद्यापीठाच्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी भरले रंग : गुंजोटीच्या श्रीकृष्ण महाविद्यालयाने खेचून आणले पारितोषिकांचे इंद्रधनुष






**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर आणि जवाहर महाविद्यालय अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने अणदूर येथे आयोजित केलेल्या धाराशिव जिल्हास्तरीय युवक महोत्सवात सहभाग घेतलेल्या श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तब्बल आठ पारितोषिक मिळवित आपल्या महाविद्यालयाची नाममुद्रा कोरण्यात यशस्वी झाले आहेत.आठ आणि नऊ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या अणदुरच्या जवाहर महाविद्यालयात श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अक्षरशः आपल्या कलाविष्कारांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. दोन दिवसीय आयोजित धाराशिव जिल्हास्तरीय युवा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपले कला गुण सादर करण्याची संधी तर मिळालीच पण त्यांच्या कलाविष्कारांना एक उत्तम व्यासपीठ मिळाले .या युवक महोत्सवासाठी जिल्ह्यातील एकूण ४७ महाविद्यालयांनी अधिकृत नोंदणी केली होती.त्यापैकी ४५ महाविद्यालयातील संघ प्रत्यक्ष सहभागी झाले.या महोत्सवात एकूण २०२ मुली आणि ११६ मुलांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला . विशेषतः यात मुलींचा सहभाग लक्षणीय होता.या युवा महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा माजी मंत्री मा.मधुकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेते योगेश सिरसाठ,सिनेअभिनेत्री रूपलक्षी चौगुले,शिक्षण संस्थेचे सचिव रामचंद्र अलुरे ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी ,विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.कैलास अंभुरे व डॉ.अंकुश कदम आदी उपस्थित होते.श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सामूहिक कलाविष्कारात लोकवाद्यवृंद प्रथम, एकांकिका द्वितीय ,विनोद अभिनय द्वितीय असे आणि शोभायात्रा द्वितीय असे पारितोषिक मिळवले तर वैयक्तिक कलाविष्कारात उत्कृष्ठ अभिनेता नागेश सूर्यवंशी , उत्कृष्ठ अभिनेत्री अनुष्का कोकणे , उत्कृष्ठ संहिता लेखन नागेश सूर्यवंशी ,उत्कृष्ट दिग्दर्शन रितेश गायकवाड असे तब्बल आठ पारितोषिक पटकावीत श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलाविष्कारांनी युवक महोत्सवात रंग भरत पारितोषिकांचे इंद्रधनुष खेचून आणण्यात यश मिळवत सर्वांचे लक्ष खेचून घेतले.त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून सर्वश्री महाविद्यालयाचे हरहुन्नरी प्राचार्य डॉ.गुलाब राठोड ,श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.दामोदर काका पतंगे,डॉ.सागर पतंगे,संस्थेचे उपाध्यक्ष श्री.प्रभाकर तात्या हिरवे यांनी सर्व विद्यार्थी आणि संघ व्यवस्थापक यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.प्राचार्य डॉ.गुलाब राठोड आणि आविष्कार चे जिल्हा समन्वयक डॉ. रामकृष्ण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संघ व्यवस्थापक डॉ.एम.जी .आंभुसे,डॉ.आर.एन.निगडे प्रा.गुरप्पा उर्फ तम्मा शेटकार,रवी दुथडमल यांनी अपार मेहनत घेतली.त्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमामुळेच हे घवघवीत यश संपादन करता आले अशी भावना व्यक्त करून प्रा. डॉ. के. एस. लोहार, प्रा. डॉ. व्ही.एस. होगाडे, प्रा.डॉ. वाय. ए. विजापुरे, प्रा. डॉ. एस. एम. पतंगे, प्रा. डॉ. जे. ए.ननवरे, प्रा.डॉ. डी.पी. चव्हाण,प्रा.डॉ.डी.एम.पठाण,प्रा. आर.एस. मांदळे ,प्रा.डॉ.बी.जे. उगले,प्रा.डॉ. आसिया चिश्ती ,प्रा.एन. जे.पवार,प्रा.डॉ.बी. ई.कोनाळे,प्रा.डॉ.एम.सी.खोत,प्रा. डॉ.पी.एस.राऊत,प्रा.आय.एस.इ नामदार ,डॉ. ए .आर. काळदाते, प्रा.आर.जी.कोळी,प्रा डॉ.आर.डी. पात्रे या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी सर्वांचे अभिनंदन केले व सर्वांच्याप्रती अभिमान व्यक्त केला.येणाऱ्या विद्यापीठाच्या आणि केंद्रीय युवक महोत्सवात असेच भरभरून यश मिळवत सर्वांनी पुढाकार घ्यावा अशी प्रामाणिक भावनाही व्यक्त केली.

## समृद्धी महामार्ग १००% सुरक्षित कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता प्रवास करावा - पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** समृद्धी महामार्ग १००% सुरक्षित कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता प्रवास करावा सदर ठिकाणी रस्त्याचे दुरुस्ती काम सुरू होते इम्पोक्सी पद्धतीने प्रक्रिया करून नोजल लावलेले होते पोलीस प्रशासन नेहमीच तुमच्या सोबत पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी सांगितलेसमृद्धी महामार्गावरील दुरुस्ती साठी लावलेल्या इपॉक्सी ग्राउटिंग मुळे तीन ते चार कारचे टायर पंक्चर झालेदि १० सप्टेंबर बुधवार रोजी रात्री साडे बारा वाजता दौलताबाद पोलीस स्टेशन हद्दीतील बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील छत्रपती संभाजी नगर कडून वैजापूर कडे जाणाऱ्या मार्गावर धुळे सोलापूर महामार्गावर असलेल्या पुलावर चॅनेल क्र 441 जवळ रात्री तीन ते चार कार चे टायर पंक्चर झाल्याचे प्रकार घडला यातील एका कार चालकाने सदर घटनेची 112 क्र वर काल करून माहिती दिली व विडिओ बनवून सोशल मीडियावर व्हायरल केले या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासन जागी झाले दौलताबाद पोलीस निरीक्षक रेखा लोंढे व कर्मचारी महामार्ग पोलीस उपनिरीक्षक मोहन चव्हाण कर्मचारी घटनास्थळी धाव घेत टायर पंक्चर झालेल्या कार चालकांना गैरेंज वर घेऊन जाऊन टायर दुरुस्ती करून मदत केलीसदर घटनेच्या ठिकाणी पोलीस उपायुक्त परिमंडळ 02 चे प्रशांत स्वामी,सहायक पोलीस उपायुक्त सुभाष भुजंग,रेखा लोंढे,वाहतूक पोलीस निरीक्षक सचिन मिरधे,वाळूज एम पोलीस निरीक्षक अमोल देवकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केलीमेघा इंजिनिअरिंग कंपनी सुपरवायझर रविशंकर एम यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले सदर ठिकाणी रस्ता दुरुस्ती चे काम सुरू होते इपॉक्सी ग्राउटिंगमध्ये दोन भागांचे उच्च-शक्तीचे इपॉक्सी रेझिन (राल) वापरले जाते.राळ आणि हार्डनर चे मिश्रण तयार करून प्रक्रिया केली जातेहे कमी-चिकटपणाचे (low-viscosity) मिश्रण भेगेमध्ये इंजेक्शनद्वारे टाकले जाते.हे रेझिन भेगेमधील रिकाम्या जागेत खोलवर शिरते आणि पूर्णपणे भरते.कठोर झाल्यावर, ते काँक्रीटला पुन्हा जोडते आणि रस्त्याची मूळ ताकद परत आणते.ही प्रक्रिया चोवीस तासासाठी असते त्याच्यानंतर नोजल काढून घेतले जातेमहामार्ग पोलीस उपनिरीक्षक मोहन चव्हाण यांनी सांगितले महामार्गावर सतत पेट्रोलिंग असते सदर ठिकाणी काही वेळा पूर्वी येथे बॅरिकेटिंग लावलेली होती वाहन भरधाव वेगाने जात असल्यामुळे कदाचित एखाद्या वाहनाच्या धक्का मुळे बॅरिकेट तुटल्याने त्याठिकाणी वाहने जाऊन पंकचर झाली होती







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ सप्टेंबर २०२५


## संजय ऐलवाड यांना मराठवाडा साहित्य परिषदेचा विशेष बालवाङ्मय पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर :** ४ मराठवाडा साहित्य परिषदेने सन २०२५ पासून बालवाङ्मयासाठी रघुनाथशिवराम बोरसे यांच्या नावाने एक विशेष बालवाङ्मय पुरस्कार सुरू केला असून 'दै. केसरी'चे पत्रकार श्री. संजय ऐलवाड हे या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले आहेत. डॉ. रामचंद्र काळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या पुरस्कार निवड समितीने श्री. ऐलवाड यांच्या 'झिब्राच्या कथा' या कथासंग्रहाची निवड या पुरस्कारासाठी केली आहे. या पुरस्काराच्या निवडीसाठी परिषदेने नियुक्त केलेल्या समितीत अध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे यांच्या शिवाय कवी श्री. रवी कोरडे आणि बालसाहित्यिक श्री. विनोद सिनकर हे अन्य दोन सदस्य होते.श्री. संजय ऐलवाड हे मूळ उदगीर तालुक्यातील एकुर्का रोड या गावातील रहिवाशी आहेत. त्यांनी २००९ पासून पत्रकारितेला सुरुवात केली असून २०१० पासून गेली पंधरा वर्षे ते पुण्याच्या 'दैनिक केसरी' या वर्तमानपत्रात बातमीदार म्हणून कार्यरत आहेत. त्यांची आजपर्यंत 'हातावरचं पोट', 'घुसमट' हे दोन कथासंग्रह; 'अंतरीच्या कविता' हा कवितासंग्रह; 'मुलाफुलांची गाणी', 'चिमणी पडली आजारी' हे दोन बालकवितासंग्रहः 'भित्रा थेंब', 'बिबट्याचे पिल्लू आणि इतर कथा', 'जिब्राच्या कथा' हे तीन बालकथासंग्रह आणि 'पिंटूची आकाशवारी', 'पोळा' ह्या दोन बालकादंबऱ्या; 'आर्टिओची गुरुकिल्ली' हे माहितीपर पुस्तक अशी एकूण १२ पुस्तके प्रसिद्ध आहेत. याशिवाय तीन संपादित पुस्तकेही त्यांच्या नावावर आहेत. त्यांना बालवाङ्मयासाठी महाराष्ट्रातील विविध संस्थांचे सुमारे २५ पुरस्कार मिळालेले आहेत.२०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या व सध्या बालवाङ्मयात चर्चेत असलेल्या 'झिब्राच्या कथा' या बालकथासंग्रहासाठी मराठवाडा साहित्य परिषदेचा हा पुरस्कार त्यांना देण्यात येणार आहे. रुपये अकरा हजार रोख, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार त्यांना शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता सुप्रसिद्ध बालसाहित्यिक श्री. बाबा भांड यांच्या हस्ते देण्यात येणार आहे.परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी आज या पुरस्काराची व पुरस्कार वितरण समारंभाची घोषणा केली. यावेळी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे, श्री. रामचंद्र तिरुके, कोषाध्यक्ष व निवड समिती प्रमुख डॉ. रामचंद्र काळुंखे, कार्यवाह डॉ. दादा गोरे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, डॉ. दीपा क्षीरसागर हे पदाधिकारी उपस्थित होते.

## १२ सप्टेंबर २०२५ रोजी देवगिरी महाविद्यालयात "आई मेळाव्याचे" आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवगिरी कनिष्ठ महाविद्यालय येथे विज्ञान ,कला, वाणिज्य व एमसीव्हीसी शाखेतील विद्यार्थ्यांच्या महिला पालकांसाठी/ मातांसाठी आई मेळाव्याचे आयोजन दि. 12 सप्टेंबर 2025 शुक्रवार रोजी सकाळी 11.30 वा. महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात करण्यात आले आहे.या आई मेळाव्यासासाठी सुप्रसिध्द समुपदेशक डॉ.अपर्णा अष्टपुत्रे (मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर) विद्यार्थ्यांच्या आई बरोबर "आई-मुलांचा एकत्र प्रवास-समज, प्रेम आणि आत्मविश्वास या विषयावर हितगुज साधणार आहेत. आई मेळाव्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांची मानसिकता, स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी करावी लागणारी जीवघेणी मेहनत, त्यांच्यावर येणारा मानसिक ताणतणाव, आई-वडिलांनी या काळात घ्यावयाची जबाबदारी, विद्यार्थ्यांचे नैराश्य आणि पालकांची भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन या मेळाव्यात करण्यात येणार आहे. आई मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नीलिमा सावंत (महाविद्यालय विकास समिती सदस्य) भूषविणार असून या मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांच्या आई पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन निमंत्रक प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर ,संयोजक उपप्राचार्य अरुण काटे, उपप्राचार्य प्रा. सुरेश लिपाने, उपप्राचार्य प्रा.विजय नलावडे, जेईई नीट सेलचे संचालक प्रा. एन. जी. गायकवाड यांनी केले आहे.

## सृजन विद्यालयात आदर्श शिक्षक पुरस्कार व विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न



**बिडकीन :** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रसिद्ध उद्योजक आबासाहेब देशपांडे यांच्या आई वडिलांच्या स्मरणार्थ 'युग कल्याण पुरस्कार', कै.भास्करराव आर्वीकर यांच्या स्मरणार्थ आर्वीकर कुटुंबीयांकडून स. भु. शिक्षण संस्थेतील एका उपक्रमशील आदर्श शिक्षकास 'भा. बा. आर्वीकर पुरस्कार' तसेच कै. वसंतराव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ राजेंद्र कुलकर्णी यांच्याकडून बिडकीन परिसरातील मराठी शाळेतील एका शिक्षकास 'उपक्रमशील आदर्श पुरस्कार' या सर्व पुरस्कारांचे वितरण दिनांक १० सप्टेंबर, बुधवार रोजी सृजन सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. न्यायमूर्ती अंबादासराव जोशी (माजी लोकयुक्त गोवा ) प्रमुख अतिथी श्रीमती सईदा फिरासत ( रिटायर मेजर ), व मा.सुधीर देशपांडे ( प्रसिद्ध उद्योजक) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. याप्रसंगी आर्वीकर कुटुंबीय, कुलकर्णी कुटुंबीय, देशपांडे कुटुंबीय , विश्वस्त सृजन शैक्षणिक प्रतिष्ठान, सचिव नितीन कंधारकर कोषाध्यक्ष दत्तात्रय चडचणकर, विशाल आर्वीकर, मंजुषा दुसाने, शालेय समिती अध्यक्ष नृसिंह कुलकर्णी सचिव डॉक्टर धरपळे, राजेंद्र कुलकर्णी बद्रीनाथ नरवडे, कल्याण राठोड राजेंद्र वैद्य, सैय्यद युनूस या सर्वांची उपस्थिती होती. इ. आठवी, नववी व दहावीतील एक गुणवंत विदयार्थी व एक गुणवंत वियार्थिनी यांना प्रत्येकी एक हजार रुपये व प्रशस्तीपत्र स्वरूप 'युगकल्याण पुरस्कार' देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवान्वित करण्यात आले. सृजन विद्यालयातील श्रीमती रेणुका अक्षय धुमाळ यांना उपक्रमशील आदर्श शिक्षक म्हणून रुपये 5000 व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवान्वित करण्यात आले. स. भु. शिक्षणसंस्थेतील जालना शाखेवरील उपक्रमशील आदर्श शिक्षक किशोर बाबूराव नावकर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन 'भा. बा.आर्वीकर पुरस्कार' देण्यात आला. कै. वसंतराव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ कुलकर्णी कुटुंबीयांकडून दिला जाणारा बिडकीन परिसरातील मराठी प्रशालेतील उपक्रमशील आदर्श शिक्षिका पुरस्कार श्रीमती अंजली नळदुर्गकर सहशिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोहगाव यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी श्रीमती सईदा फिरासत मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात इयत्ता आठवी ते दहावी या तीन वर्षात विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन अभ्यास केल्यास देशसेवेसाठी सैन्यामध्ये सहभागी होण्यासाठी असणाऱ्या पूर्व परीक्षा उत्तीर्ण होण्यास मदत होईल,असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आचल मिसाळ व कु.वेदिका कासुळे या विद्यार्थिनींनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शालेय समिती अध्यक्ष नृसिंह कुलकर्णी व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक रवींद्र ठाणगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंदाने परिश्रम घेतले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ सप्टेंबर २०२५


# नेपाळचा भारताला संदेश



नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका, अफगानिस्तान, म्यानमार (आणि पाकिस्तान कायम बंदूकीच्या नळीवर) या भारताच्या शेजारी देशांतील जनतेची खदखद रस्त्यात उतरली. नेपाळ पेटण्याचे तात्कालीक कारण सोशल मीडिया असले तरी प्रचंड भ्रष्टाचार, बेरोजगारी, राजकारण्यांची स्वार्थी कारस्थाने, सर्व स्वायत्त संस्था सत्तेच्या हाती असणे, येनकेन प्रकारे सत्ता मिळवणे, तरूण वर्गाला योग्य शिक्षणाची सोय न करणे आणि महागाई असे अनेक कारणे आहेत. नेपाळमध्ये अर्थमत्र्यांला पळवून सिनेमा पध्दतीने मारले. इतर मंत्री, पत्रकारांना मारले. पंतप्रधान पळाले. कोर्ट, संसद, सरकारी कार्यालये, इनकम टॅक्स ऑफिस जाळले. लोकशाहीत ढवळाढवळ करणे हे यादवीला निमंत्रण देणारी बाब ठरते. भारतात काय सुरू आहे? लोकशाहीचे चारही स्तंभे सत्तेच्या हाती एकवटले आहेत. स्वायत्त संस्था स्वायत्त राहिल्या नाहीत. बँका उद्योजकांनी लुटल्या, जे पळाले ते परत आणले जात नाहीत. जे उद्योजक इथे आहेत त्यांचे कर्ज माफ केले जात आहेत. जमिनी स्वस्तात उपलब्ध केल्या जातात, सवलती दिल्या जातात. सर्वसामान्य माणसांवर मात्र अतिरिक्त कर लादले जात आहेत. निवडणूक आयोग विश्वासार्ह नाही. पत्रकार विकले गेलेत. खासदार, आमदार, राजकीय पक्ष विकत घेतले जातात. शिक्षणाची गुणवत्ता खालावली, बेरोजगार तरूणांची संख्या प्रचंड वाढली आहे, त्यांना धर्माच्या नशेत ठेवले जाते. भारताच्या सत्ताधाऱ्यांनी आणि सर्व राजकीय पक्षांनी सावध व्हावे! भारताच्या लोकशाहीची चालू दशकात पार वाट लागली आहे! आपल्याला स्वातंत्र्यासाठी खूप मोठी किंमत मोजावी लागली, त्यानंतर काही चांगल्या लोकांनी देशाची एकता टिकवली आहे. म्हणून कोणीही अराजकाला निमंत्रण देऊ नये.

**डॉ. सुधीर रा. देवरे, मो.** 75886 18857

# गल्ले बोरगाव ते चिखलठाण रस्ता बनला मृत्यूचा सापळा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील गल्ले बोरगाव ते चिखलठाण या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. वाहनधारकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे, चिखल, साचलेले पाण्यामुळे रस्त्यातील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघात घडत आहेत. रात्रीच्या वेळी हा रस्ता अधिक धोकादायक ठरत आहे.गल्ले बोरगाव पासून चिखलठाण अंतर केवळ 15 ते 20 किमी आहे.गल्ले बोरगाव वरुन कन्नड ला जोडणारा अत्यंत जवळचा हा मार्ग आहे. या मार्गावरून कन्नड ला 5 ते 8 खेड्यांची दळणवळण व्यवस्था चालते. मात्र, खराब रस्त्यामुळे ही व्यवस्था कोलमडत आहे. खड्डे इतके मोठे आहेत की, या रस्त्याच्या दुरावस्थेकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत आहे. नागरिकांत यामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ठिकठिकाणी रस्ता उखडला असून मोठमोठे खड्डे व खाचखळगे पडले आहेत.रस्त्यांवरून गुढघ्या इतकाले पाणी वाहत आहे हा ओढा आहे की रस्ता हेच प्रवाशांना कळायला मार्ग नाही यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे जोखमीचे झाले आहे. या मार्गावरून वाड्या वस्त्यांवरील शेतकरी दळणवळणासाठी वापर करतात.शाळेतील विद्यार्थी निमडोंगरी(ठाकरवाडी) ते या वाड्यांपासून तिसगाव विद्यालय तिसगाव व शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव या शाळेत पाई पाई ये-जा करणा-या विद्यार्थांचे हाल होत आहे.काही विद्यार्थी स्कुल बसमध्ये येतात तर स्कुल बस मध्ये जावे का पाई जावे विद्यार्थांत संभ्रम निर्माण झाला आहे.जोडलेली गावे खुलताबाद व कन्नड तालुक्यातील पिंप्री, निरगुडी बु, खु कोलमडत ठाकरवाडी,तिसगाव,घुसूर,तांडा,निमडोंगरी,ठाकरवाडी या गावांचा शेती पिकांची वाहतूक व अन्य कामांसाठी याच रस्त्यांचा वापर होतो. हा रस्ता खुलताबाद व कन्नड हद्द असलेली गल्ले बोरगाव व पुढे तिसगाव चिखलठाण गावापर्यंत खूपच खराब आहे.

# मुरूम परिसरात ढगफुटी; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम व परिसरात झालेल्या पहाटे तीन ते सहा च्या दरम्यान बुधवारी (ता. 10) रोजी ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या ढगफुटीमुळे सोयाबीन, तूर, उडीद व ऊस पिके पाण्यात बुडाली असून अनेक शेतकऱ्यांचे शेतबांध फुटून सुपीक माती वाहून गेली आहे. या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. या परिसरातील मुरूम, अंबरनगर, फुलसिंग नगर, आचार्य तांडा, इंगोले तांडा, तुगाव, बेळंब आदी गावातील शेत पिकांचे नुकसान झाले. या संदर्भात भाजप मुरूम मंडळाच्या वतीने तहसील कार्यालयात निवेदन नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे व कृषी कार्यालयात कृषी अधिकारी रीतापुरे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर भाजप मुरूम मंडळ अध्यक्ष निरजानंद अंबर, साईराज टाचले, सुनिल शिंदे, श्रीकांत बेंडकाळे, सुरेश शेळके, रामकृष्ण अंबर, विकास देडे व भाजप कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ११ सप्टेंबर २०२५


## प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे यांचा सत्कार




**जालना :** राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयातील डॉ. सोमीनाथ खाडे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संचालक पदी नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.डॉ. सोमीनाथ खाडे यांनी महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेत उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी आणि जिल्हा समन्वयक म्हणून भूमिका बजावली होती. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध प्रकारचे उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली. विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून डॉ. खाडे यांची जालना परिसरात व शैक्षणिक वर्तुळात ओळख आहे. विद्यापीठ स्तरावर सुद्धा एक उत्तम प्रकारचे कार्य ते उभे करतील अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.याप्रसंगी डॉ. भगवानसिंग डोभाळ, डॉ. कालिदास सूर्यवंशी, डॉ. उद्धव थोरवे, डॉ. प्रवीण कोकणे, डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. संभाजी कांबळे, प्रा. राजक्रांती वलसे, डॉ. माधव हेबाडे, डॉ. क्षमा अनभुले, डॉ. व्यंकट कोरेबोईनवाड यांची यावेळी उपस्थिती होती.

## स्वयंसेवा माध्यमातून मिटमिटा मनपा शाळेत शालेय साहित्याचे वाटप



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** मिटमिटा येथील मनपा माध्यमिक शाळेत पुणे येथील उद्योजक श्री.नितीन पगारिया आणि मिटमिटा येथील मातोश्री तुळसाई प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने म.न.पा.उपायुक्त (शिक्षण )अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली व मातोश्री तुळसाई प्रतिष्ठान, मिटमिटा तथा संभाजीनगर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अशोक पाटील मुळे,मनपा शालेय समिती अध्यक्ष लक्ष्मण बनकर, पर्यटन उपसंचालक प्रादेशिक कार्यालयाचे पर्यटन सहाय्यक शिवाजी गायकवाड,मुख्याध्यापक लक्ष्मीकांत नन्नावरे, यांच्या हस्ते शाळेतील गरजू विद्यार्थी विद्यार्थ्यांना शालेय बॅग चे साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी राजेश जाधव, रामकिसन वाकळे शिक्षक डी.डी.देवरे, सुभाष पंडित,नन्नावरे एस .एस. ,म्हस्के डी. जे,पवार पी.व्ही, तडवी एच. एन. यांची उपस्थिती होती.

## सांज सकाळी

सांज सकाळी ऊन सोनेरी
हिरवाईवर पडे
भल्या पहाटे दवबिंदूचे
धरतीवर सडे..

सकाळ होता शेतशिवारी
निघाली पाखरे
गायीसोबत चरण्या रानी
चालली वासरे..

पानामधून मंजूळ गाणी
गाऊ लागले वारे
रामप्रहरी डोंगर रानी
मेघांचे फवारे..

रान फुलांच्या सुगंधाने
खुलली तराई
वाऱ्याचा स्पर्श होता
फुलली वनराई..

चादर पांघरून धुक्यांची
सजली पळस फुले
हिरव्या गालिच्यावर
फुलपाखरं डूले..

नदी किनारी मोर नाचे
फुलवून पिसारे
सप्तसुरात बोले
कोकीळ वाऽ रे वाऽ रे ..

ज्ञानेश्वर गायके,कन्नड
मो.९४०३३८४८८९

## जून २०२५ सेट परीक्षेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी उत्तीर्ण



**उमरगा (प्रतिनिधी) :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात आपली छाप उमटवली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या राज्य पात्रता परीक्षा (SET) जून २०२५ मध्ये या महाविद्यालयातील आठ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यांच्या गौरवासाठी महाविद्यालयात अभिनंदन व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयातील भाग्यश्री बिराजदार, हिंदी विषयातील पृथ्वीराज जाधव व सूनिता राठोड, समाजशास्त्र विषयातील ललिता राठोड, भौतिकशास्त्र विषयातील प्राजक्ता साठे तसेच रसायनशास्त्र विषयातील मदनसूरे विष्णु, चव्हाण शंकर व मोरे श्रेया यांनी यश संपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना प्राचार्य अस्वले म्हणाले की विद्यार्थ्यांच्या यशामागे महाविद्यालयाचा दर्जेदार अभ्यासक्रम, प्राध्यापकांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांचे परिश्रम या त्रिसूत्रीचा महत्त्वाचा वाटा आहे. SET परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण व संशोधन क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करावेत असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे मार्गदर्शन, अभ्यासक्रमाची पद्धतशीर रचना व सतत मिळणारे प्रोत्साहन यामुळे हे यश शक्य झाल्याचे सांगितले विद्यार्थ्यांनी सांगितले.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, पदव्युत्तर समन्वयक डॉ. सन्मुख मुच्छटे, डॉ. व्यंकट सूर्यवंशी, डॉ. भास्कर लबडे, डॉ. प्रदीप पाटील, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. सन्मुख मुच्छटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थित यांचे आभार मानले.